पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

# हिंदुस्थान

७६ वर्ष स्नेह, विश्वास आणि परंपरेचे

www.dainikhindusthan.com
marathevinod62@gmail.com
epaper.dainikhindusthan.com

संविधान निर्माता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिवस शत शत नमन..!

■ वर्ष ७६ वे/अंक १०९ वा ■ ■ अमरावती, शनिवार,दिनांक ६ डिसेंबर २०२५ ■ ■संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे■ ■ भारतीय सौर १६ मार्गशिर्ष १९४७ ■ ■ पृष्ठे १६ ₹ ४.०० ■

किलो प्रमाणे मिळेल
ग्रिन नेट चे होलसेल विक्रेता
९९९ च्या खरेदरवर आकर्षक उपहार मोफत
सागर प्लास्टिक
100% होलसेल भावात
प्रो. प्रा. आकाश प्रकाशराव शिरभाते
मल्टी मॉल
चित्रा चौक, फुटाणा लाईन, अमरावती
इस से सस्ता और अच्छा कही नही
8184057777
9822032885
ग्रिन नेट चे होलसेल विक्रेता
किलो प्रमाणे मिळेल ९९९ च्या खरेदरवर आकर्षक उपहार मोफत

# पुतिन यांचा दौरा सुफल

## भारत – रशियात ७ मोठे महत्त्वाचे करार

नवी दिल्ली दि. ५ : रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादीमीर पुतिन भारत दौऱ्यावर आहेत. अनेकार्थाने पुतिन यांचा भारत दौरा महत्त्वाचा मानला जात आहे. अवघ्या जगाचे लक्ष या दौऱ्याकडे आहे. सर्व प्रोटोकॉल बाजूला ठेवून पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः पुतिन यांचे स्वागत करण्यासाठी पालम विमानतळावर गेले. यानंतर दोघे पंतप्रधान निवासस्थानी पोहोचले. यानंतर शुक्रवारी दोन्ही देशांमध्ये अनेक क्षेत्रात मोठे आणि महत्त्वाचे करार झाले.



मिळालेल्या माहितीनुसार, व्लादीमीर पुतिन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात हैदराबाद हाऊस येथे द्विपक्षीय चर्चा संपन्न झाली. चर्चेनंतर दोन्ही देशांमध्ये करारांची देवाणघेवाण झाली. पंतप्रधान मोदी आणि पुतिन यांच्यात झालेल्या चर्चेदरम्यान झालेल्या करारांमध्ये कामगार स्थलांतर, आरोग्य सेवा, वैद्यकीय शिक्षण, अन्न सुरक्षा, जहाजबांधणी, रसायने आणि खते यासारख्या मुद्द्यांचा समावेश होता. पुतिन यांच्यासोबत झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत पंतप्रधान मोदींनी रशियाच्या लोकांसाठी एक महत्त्वाची घोषणा केली. भारताने रशियन लोकांसाठी मोफत ई-टूरिस्ट व्हिसा सुरू केला आहे. हा ई-व्हिसा ३० दिवसांसाठी वैध असेल.

**भारत आणि रशिया या दोन्ही देशांमध्ये कोणते करार झाले?**

१. सहकार्य आणि स्थलांतर करार
२. तात्पुरत्या कामगार उपक्रम करार
३. आरोग्यसेवा, वैद्यकीय शिक्षण करार
४. अन्न सुरक्षा आणि मानक करार
५. ध्रुवीय जहाजांसदर्भात करार
६. सागरी सहकार्य करार
७. खतांसंदर्भात करार

दरम्यान, खतांवरील करारात अशी अट होती की, भारत आणि रशिया संयुक्तपणे युरियाचे उत्पादन करतील. भारत रशियाकडून मोठ्या प्रमाणात युरिया आयात करतो. या करारामुळे आता भारताला रशियाच्या सहकार्याने युरियाचे उत्पादन करण्याची परवानगी मिळेल.

# नगरपालिका-नगरपंचायतीचा निकाल २१ डिसेंबरलाच

नवी दिल्ली दि. ५ : नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकीच्या निकालाबाबत मोठी बातमी समोर आली आहे. नगरपालिका आणि नगर पंचायतीची मतमोजणी २१ डिसेंबरलाच होणार असल्याचा निर्णय सुप्रीम कोर्टाने दिला आहे. नागपूर खंडपीठाच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका सुप्रीम कोर्टात दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर आज सुनावणी झाली यावेळी सुप्रीम कोर्टाने ही याचिका फेटाळून लावत नागपूर खंडपीठाचा निर्णय कायम ठेवला आहे.



नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीचे निकाल २१ डिसेंबरला जाहीर होतील असे नागपूर खंडपीठाने स्पष्ट केले होते. नागपूर खंडपीठाच्या निकालाला सुप्रीम कोर्टात आव्हान देण्यात आले होते. २ डिसेंबर रोजी झालेल्या निवडणुकीच्या मतदानाचे निकाल २० डिसेंबरच्या मतदानापूर्वी म्हणजेच २१ डिसेंबरच्या *(उर्वरित पान २ वर)*

# सिगारेट, पान मसाला महागणार

नवी दिल्ली दि. ५ : केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी नुकतेच लोकसभेत 'आरोग्य सुरक्षेपासून राष्ट्रीय सुरक्षा उपकर विधेयक, २०२५' सादर करून एक महत्त्वपूर्ण आर्थिक सुधारणा केली आहे. या विधेयकाचा उद्देश देशाच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी आणि सार्वजनिक आरोग्याच्या खर्चासाठी कायमस्वरूपी निधीचा स्रोत उपलब्ध करणे आहे.

या विधेयकानुसार, हा नवीन उपकर केवळ पान मसाला, गुटखा आणि अधिसूचित केलेल्या इतर हानिकारक उत्पादनांवर लावला जाणार आहे. यामुळे पीठ, डाळ किंवा इतर कोणत्याही जीवनावश्यक वस्तूंच्या *(उर्वरित पान २ वर)*

# २४ तासांत ५५० हून अधिक उड्डाणे रद्द, इंडिगोच्या प्रवाशांचे प्रचंड हाल

नवी दिल्ली दि. ५ : इंडिगो एअरलाईन्सच्या विस्कळीत सेवेमुळे प्रवाशांना मोठा फटका बसला आहे. १ नोव्हेंबरपासून लागू झालेल्या नवीन 'पायलट ड्युटी टाईम लिमिटेशन्स' नियमांमुळे इंडिगोला पायलटच्या कमतरतेचा सामना करावा लागत आहे. यामुळे दिल्ली, मुंबई आणि बंगळुरू येथून ५५० हून अधिक उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. त्यामुळे प्रवाशांचे हाल होत आहे. कंपनीने १० फेब्रुवारीपर्यंत या नियमात सवलत मिळावी, अशी मागणी डीजीसीआयकडे केली आहे.

इंडिगोच्या फ्लाइटचे उड्डाण रद्द झाल्यामुळे तिकीट दरात मोठी वाढ झाली असून प्रवाशांनी संताप व्यक्त केला आहे. मुंबई, पुणे, दिल्ली, हैदराबाद *(उर्वरित पान २ वर)*

# इंडिगोच्या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी होणार : मुरलीधर मोहोळ

नवी दिल्ली दि. ५ : इंडिगो एअरलाईनमुळे पुणे, मुंबई, कोलकाता आणि दिल्ली विमानतळावरुन प्रवास करणाऱ्या विमान प्रवाशांची कालपासून मोठी गैरसोय झाल्याचं पाहायला मिळत आहे. इंडिगो विमानाचे बुकींग असलेल्या प्रवाशांना याचा मोठा फटका बसला आहे. याबाबत केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. इंडिगोच्या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी होणार असल्याची माहिती केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली. या प्रकरणाची केंद्र सरकारकडून गंभीर दखल घेतली आहे. *(उर्वरित पान २ वर)*



# नाकावर टिच्चून! भारताला इंधन पुरवठा सुरूच राहणार, पुतिन यांनी स्पष्टच सांगितले; मोदींचीही रशियासाठी मोठी घोषणा

नवी दिल्ली दि. ५ : रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन हे दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आहेत. गुरुवारी दिल्लीत आगमन झाल्यानंतर पंतप्रधान मोदींनी त्यांचे स्वागत केले. आज, ते २३ व्या भारत-रशिया शिखर परिषदेत पंतप्रधान मोदींसोबत व्यापार, संरक्षण आणि ऊर्जा क्षेत्रातील महत्त्वाच्या करारांवर चर्चा केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यातील द्विपक्षीय चर्चेनंतर, दोन्ही बाजूंनी संयुक्त निवेदनात संबंध मजबूत करण्याचा आणि दहशतवादाविरुद्ध संयुक्तपणे लढण्याचा संकल्प व्यक्त केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, भारत आणि रशियामधील मैत्री ही ध्रुवताऱ्यासारखी आहे. गेल्या आठ दशकांत अनेक चढ-उतार पाहिले आहेत. मानवजातीने अनेक आव्हाने आणि संकटांना तोंड दिले आहे.

महत्त्वाच्या खनिजांबाबत सहकार्य खूप महत्वाचे आहे. भारत सुरुवातीपासूनच युक्रेन मुद्द्यावर शांततेच्या बाजूने आहे,असंही मोदी म्हणाले. यावेळी पीएम *(उर्वरित पान २ वर)*

# पुतिन यांना मोदींकडून भगवद्गीता भेट

नवी दिल्ली दि. ५ : रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांचे भारतात आगमन झाल्यावर पहिल्याच भेटीत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी त्यांना रशियन भाषेत अनुवादित भगवद्गीतेची प्रत भेट दिली. भगवद्गीता जशी आहे तशी... या शीर्षकाची ही आवृत्ती आहे. हे सूचक यासाठी की पंतप्रधान मोदींनी पुतिन यांना सादर केलेल्या भगवद्गीतेच्या आवृत्तीवर रशियामध्ये मोठा खटला सुरू होता. २०११ मध्ये रशियामध्ये गीतेवर बंदी घालण्याची मागणी करण्यात आली होती. तेव्हा भारत सरकारने तत्कालीन रशियन सरकारकडे त्याबद्दल तीव्र निषेध नोंदवला होता.

पंतप्रधान *(पान २ वर)*

# युक्रेन-रशिया युद्धात भारत तटस्थ नाही, आम्ही शांततेच्या बाजूने : मोदी

नवी दिल्ली दि. ५ : रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात आज द्विपक्षीय संबंधांवर बैठक पार पडत आहे. यावेळी दोन वर्षांहून अधिक काळ सुरू असलेल्या युक्रेन-रशिया युद्धावर पंतप्रधान मोदींनी भारताची भूमिका मांडली. भारत या युद्धात तटस्थ नाही. तर आम्ही शांततेच्या बाजूने आहोत, असे पंतप्रधान मोदी यांनी स्पष्ट केले. मी अनेक जागतिक नेत्यांशी चर्चा करत असताना आमची ही भूमिका वेळोवेळी मांडत आलो आहे, असेही ते म्हणाले.

दिल्लीतील हैदराबाद हाऊसमध्ये व्लादिमीर पुतिन आणि पंतप्रधान मोदी यांच्यात बैठक झाली. यावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले, जगाने आता शांततेच्या मार्गावर परतले पाहिजे. आम्ही शांततेच्या हरऐक प्रयत्नांना पाठिंबा देऊ. युक्रेन संघर्षात भारत तटस्थ नाही. भारत शांततेच्या बाजूने आहे. भारत-रशिया संबंध अधिक दृढ होऊन त्याने नवी उंची गाठायला हवी.

पंतप्रधान मोदींच्या या भूमिकेबद्दल राष्ट्राध्यक्ष पुतिन यांनी आभार व्यक्त केले. तसेच युक्रेन संघर्षात भारत शांततेसाठी आग्रही असल्याच्या भूमिकेचे स्वागत केले.

पंतप्रधान यांनी मांडलेल्या भूमिकेवर *(पान २ वर)*

## माहोल....




पहिले ट्रेन लेट व्हायच्या आता विमानं रद्द होतात. प्रगती म्हणतात ही!!

मराठवाड्याचा प्रसिध्द सुरती हुरडा
दीपक देवचंद आप्पा
आमचा नवीन पत्ता
पन्नालाल नगर बगीच्या समोर
M. 9422857286

अत्याधुनिक फर्निचर व गिफ्ट आर्टिकल्स चे सर्वांग सुंदर दालन
Nilkamal
BAJAJ FINSERV
श्री अॅम्बीयन्स फर्निचर अॅन्ड इंटेरीयर मॉल
■सोफा सेट ■बेडरुम सेट ■टि टेबल, मंदिर
■डायनिंग टेबल ■आॅफिस फर्निचर ■स्टिल अलमारी ■गिफ्ट आर्टिकल्स
एकनाथपुरम, शंकर नगर, अमरावती Ph.0721-2677002

Amit R. Bijwe
Mob.: 9422917360
FISH O FISH AQUARIUM
Up to 20% Discount
Dog Food & Accessories
Birds Cages
•Pedigree •Royal Canin •N&D •Whiskas •SmartHeart •Me-O
•Fishes •Fancy Imported Tank •Aquarium Accessories
Ganesh colony, Shilangan Road, (Ravi Nagar Road) Amt. ☎ : 2562939

Sleepwell MATTRESSES
COMFORTERS BED SHEETS CURTAINS
संपूर्ण एकाच छत्रा खाली
आशिर्वाद फोम हाऊस
गालिचे
मुधोळकर पेठ, बडनेरा रोड, अमरावती. फोन : २५७९०९६
Mo. 9637960639

पैठणी महोत्सव
आराधना होलसेल शॉपिंग मॉल
पैठणी व सिल्क साड्यांवर स्पेशल ऑफर
• बनारसी शालू • डिझायनर साड्या • घागरा ओढनी • सलवार सुट
• ड्रेस मटेरियल • रेडीमेड कोट
• सुटिंग-शर्टिंग • टिनेज वेअर • किड्स वेअर
फॅशन | ज्वेलरी | चिल्ड्रेन्स वेअर | शूज व सैंडल | होम डेकोर | मॅचिंग
जवाहर रोड, अमरावती. ✆ 2574594
L -2, बिझीलॅन्ड, नांदगावपेठ, अमरावती.